# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### आळंदी नगरपरिषदेला भामा आसखेड धरणातून पिण्याचे पाणी देण्याबाबत

**(१) १५७० (०३-१२-२०१४). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी नगरपरिषदेला पिण्याचे पाणी भामा आसखेड धरणातून पुरवठा करण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय वा कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत सुजल निर्मल योजना नगरपरिषदेने १०% लोक वर्गणी न भरल्याने रद्द करण्यात आली. तथापि नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत योजना राबविण्यासाठी आळंदी नगरपरिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे.

---

### धरणगांव (जि. जळगांव) येथे प्राचीन काळापासून पाण्याचे दुर्भिक्ष असल्याबाबत

**(२) १९९७४ (१०-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरणगांव (जि. जळगांव) येथे प्राचीन काळापासून पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने शहरातील चारही तलावाचे पुनरुज्जीवन व संवर्धन, खोलीकरण, सुशोभिकरण करण्यासाठी पर्यावरण विकास मंत्रालयाकडे रुपये तेरा कोटी सहा लाखाचा प्रस्ताव मंजूरी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूरी अभावी प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) तसेच लोकसंवर्धन योजनेअंतर्गत बी.बी.तलावाच्या सरंक्षण भिंतीसाठी १७ लाखांचा निधी मंजूर आहे केवळ कामाला जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता न दिल्याने सदर निधी नगरपालिकेकडे पडून असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) तदनुसार उक्त प्रस्तावाना तात्काळ मंजूरी देऊन कामे पूर्णत्वास नेण्याच्यादृष्टीने तसेच पाणी टंचाई निवारण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१६) :**(१) व (२) धरणगाव, जि.जळगाव येथील तलावांचे पुनरुज्जीवन, संवर्धन, खोलीकरण, सुशोभिकरण करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावात पर्यावरण विभागाने दुरुस्ती सुचविल्यानुसार नगरपरिषदेच्या स्तरावर नवीन प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.
(३) धरणगांव नगरपरिषदेने जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केलेल्या प्रस्तावात आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता नगरपरिषदेकडून करण्यात आलेली नाही.
(४), (५) व (६) सार्वजनिक प्राचीन स्मारके व लेक संवर्धन योजनेंतर्गत सन २०१२-१३ मध्ये नगरपरिषदेला उपलब्ध करुन दिलेला निधी शासनास जमा करण्याच्या सूचना दि.२५ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिलेल्या आहेत.

सदर प्रस्तावाबाबत नगरपरिषद स्तरावरुन कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

---

**नाशिक येथील सेंट फ्रन्सिस या इंग्रजी माध्यम शाळेच्या तिडके कॉलनी व राणेनगरच्या शाखांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासण्याबाबत**

**(३) २९८०४ (२१-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील सेंट फ्रन्सिस या इंग्रजी माध्यम शाळेच्या तिडके कॉलनी व राणेनगरच्या शाखांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना व्यवस्थापनाकडून ओपन आऊस करिता नियंत्रीत करण्यात आलेल्या ज्या पालकांनी फी भरलेली नाही त्यांच्या पाल्याच्या उत्तर पत्रिका तपासण्यात आल्या नसल्याचा आरोप पालकांनी केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने मध्यस्थी करुन संबधित शाळेच्या विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिका तपासण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१६) :** (१) होय.

(२) नाशिक महानगरपालिका, नाशिक स्तरावरील तक्रार निवारण समितीसमोर या प्रकरणी सुनावणी घेण्यात आली. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे प्रगती पुस्तक, शैक्षणिक अहवाल विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावेत. मुलांना वर्गातून वेगळे बसवू नये, असे कळविण्यात आले. तसेच प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, नाशिक यांनी शाळेमध्ये प्रत्यक्ष भेट देवून सर्व विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासल्याची खात्री करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**राज्यातील दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार मिळण्याबाबत**

**(४) ३८९१७ (३०-११-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण देण्यात यावा, अशी मागणी मा. लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१६) :** (१) व (२) शालेय पोषण आहार हि केंद्र पुरस्कृत योजना असून केंद शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येते. शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळा इ.मध्ये शिकणारे इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे विद्यार्थी सदर योजनेचे लाभार्थी आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील शिक्षण प्रसारक मंडळाच्या बी.एल.पाटील तंत्रनिकेतन महाविद्यालयात प्राध्यापकांअभावी विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान**

**(५) ४०८८२ (०५-०५-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील शिक्षण प्रसारक मंडळाच्या बी.एल.पाटील तंत्रनिकेतन महाविद्यालयात प्राध्यापकांअभावी अपूर्ण अभ्यासक्रम व परीक्षा न झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक व शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत अनेक महिन्यांपासून पगार न झाल्याने उक्त महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार आंदोलने करुनही महाविद्यालय प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्राध्यापकांसह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अनेक वेळा काम बंद आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१६) :**(१) संस्थेमध्ये महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांचे वर्ग व प्रात्यक्षिके घेण्यात आले असून मंडळाकडून उन्हाळी परीक्षा-२०१६ घेण्यात आलेली आहे.

(२) सदर विद्यालयातील काही प्राध्यापकांनी राजीनामा दिलेला आहे, हे खरे आहे.

(३), (४) व (५) सह संचालक तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांचे स्तरावर गठित केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार सदर संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ ला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने "नो ॲडमिशन कॅटेगरीमध्ये" समावेश केला होता तसेच पेण अर्बन बँक बंद झाल्याने कोटयवधी रुपये अडकून राहिल्याने संस्थेची आर्थिक परिस्थिती बिकट झाली असून काही प्राध्यपकांनी राजीनामे दिले आहेत त्यामुळे संस्थेमध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानांकनाप्रमाणे शिक्षकीय पदांची नियुक्ती तात्काळ करण्यासंबंधी संस्थेस, विभागीय कार्यालयाचे स्तरावरुन कळविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

---

## शिरुड-धामणगाव (जि.धुळे) शिवारात बनावट दारु अड्डयावर कारवाई करताना स्पिरिटचा स्फोट झाल्याबाबत

**(६) ४१५४८ (१७-०५-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील शिरुड-धामणगाव (जि.धुळे) शिवारात बनावट दारु अड्डयावर कारवाई करतानां स्पिरिटचा स्फोट होऊन जखमी झालेले हेड कॉन्स्टेबल श्री. आनंदा माळी यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे,

सदरची घटना दि.३०/१२/२०१५ रोजी घडली असून घटनेतील गंभीर जखमी झालेले पो.हे.कॉ./१००० दि.०४/०१/२०१६ रोजी औषधोपचार सुरु असताना मयत झाले.

(२) सदर प्रकरणी धुळे पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३१६/२०१५ भा.दं.वि.कलम ३२८, ४२०, ३३७, ३३८, २०१, ३४ सह मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५(अ)(ब)(क)(ड)(ई) प्रमाणे गुन्हा दाखल असून त्यामध्ये पुढे भा.दं.वि.कलम ३०४(२) लावण्यात आले आहे.

गुन्ह्याच्या तपासात ४ आरोपी निष्पन्न झाले असून, सर्व आरोपींना अटक करुन पोलीस कस्टडी दिली आहे. सद्य:स्थितीत सदरचे आरोपींना मा. न्यायालयात जामिन मिळाला आहे. गुन्ह्यात वापरलेली सर्व सामुग्री जप्त करण्यात आली असून स्पिरीटचे नमुने केमिकल ॲनालायझर, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविले आहेत. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेच्या पोखरण रोड नं ०१ च्या रस्ता रुंदीकरणामध्ये बेघर झालेल्यांना बीएसयुपी योजनेमध्ये घर देण्याबाबत**

**(७) ४१७३० (१३-०५-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या पोखरण रोड नं ०१ च्या रस्ता रुंदीकरणामध्ये जी कुटुंबे बेघर झाली आहेत त्या सर्व कुटुंबाना बीएसयुपी योजनेमध्ये घर देण्यात येणार असल्याचे ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, पोखरण रोड नं १ मध्ये अनधिकृत झोपडीधारकांच्या घरपट्टीवर अनधिकृत बांधकाम असा शिक्का असणाऱ्या झोपडीधारकांच्या किंवा बेघर कुटुंबांचा यामध्ये समावेश करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१६) :**(१) व (२) ठाणे महानगरपालिकेच्या पोखरण रोड नं.०१ च्या रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होणा-या पात्र निवासी बेघरांना बी.एस.यु.पी. अंतर्गत बांधण्यात आलेल्या गृहनिर्माण प्रकल्पात कायमस्वरुपी घरे देण्यात आली आहे.

उर्वरित बेघरांना एम.एम.आर.डी.ए.रेंटल हौसिंग स्कीम मध्ये घरे देण्यात आली असून, ज्यावेळेस ठाणे महानगरपालिकेकडे कायमस्वरुपी घरे उपलब्ध होतील त्यावेळेस सदरहू बेघरांना प्राधान्यक्रमाने कायमस्वरुपी घरे शासनाने/ठामपाने वेळोवेळी ठरविलेल्या नियमानुसार शुल्क आकारुन ताबा देण्यात येईल.

(३) केंद्र व राज्य शासनामार्फत बीएसयुपी अंतर्गत मंजूर असलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालात अतिरिक्त (उदा.आरक्षण, विकसन-रस्ता रुंदीकरण, झोपडपट्टी पुनर्विकास या सम प्रकल्प) विकास करताना त्यामधील बाधित झोपडीधारकांना/रहिवाशांना बीएसयुपी योजनेच्या मार्गदर्शक मार्गदर्शक तत्त्वानुसार लाभ देणेचे अंतर्भूत आहे. रस्ता रुंदीकरणात बाधित झालेले जे सदनिकाधारक बेघर झालेले आहेत अशांचा पात्र लाभार्थीच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

(४) लागू नाही.

---

**मालेगाव मनपाने वस्त्रोद्योग व्यवसायाशी संलग्न असणा-या मजूर, कामगार, टेक्निशियन इ.साठी घरकुले उपलब्ध करुन देणेबाबत**

**(८) ४२५४३ (२७-०४-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव मनपाने वस्त्रोद्योग व्यवसायाशी संलग्न असणा-या मजूर, कामगार, टेक्निशियन इ.साठी शासन निर्णयानुसार मौजे म्हाळदे व सायने येथील शिल्लक राहणाऱ्या जागेवर वा शहराच्या इतर कुठल्याही योग्य जागी घरकुल योजना प्रस्ताव महासभा ठराव क्र.२७ दि.२०.९.२०१२ अन्वये शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावार शासनाने निर्णय घेऊन या कामगारांसाठी घरकुले उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१६-११-२०१६) :** (१), (२) व (३) केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियानांतर्गत आयएचएसएसडीपी या योजनेअंतर्गत मालेगाव महानगरपालिकेमार्फत एकूण १५८४० इतक्या घरकुल योजनेस केंद्रीय मंजूरी व संनियंत्रण समितीच्या दि.२१.१.२००९ व दि.२८.३.२०१२ मध्ये मंजूरी देण्यात आली आहे. माहे सप्टेंबर, २०१६ च्या मासिक प्रगती अहवालानुसार मालेगाव महानगरपालिकेने एकूण १५९७२ मंजूर घरकूलांपैकी एकूण ७१६८ घरकुलांचे काम पूर्ण झाले असून या घरकुलांचा ताबा महो डिसेंबर, २०१६ पर्यंत लाभार्थ्यांना देण्यात येईल तसेव उर्वरित ८६०४ इतक्या घरकुलाचे काम प्रगतीपथावर असून या घरकुलांचे काम मार्च, २०१७ पर्यंत पूर्ण करुन त्याचा ताबा लाभार्थ्यांना देण्यात येईल, असे मालेगाव महानगरपालिकेने कळविले आहे. या योजनेसंदर्भात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार ज्या जागेवर लाभार्थी राहत असेत त्याच जागेवर (In-Situ) पध्दतीने तसेच स्थलांतरीत (Relocation) पध्दतीने घरकुलांचे वाटप लाभार्थ्यांचे पात्रतेचे निकष तपासून मालेगाव महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे.

मालेगाव महानगरपालिका महासभेने ठराव क्र.२७ दि.२०.०९.२०१२ रोजी मान्यता दिल्यानुसार या योजनेअंतर्गत यापूर्वी मंजूर झालेली व तयार होत असलेली घरकुले वस्त्रोद्योग व्यवसायाशी संलग्न मजूर कामगार, टेक्निशियन इ.उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच मौजे मालधे येथील शिल्लक राहणा-या जागेवर नव्याने सुमारे ५००० घरकुलांच्या प्रस्तावास मान्यता दयावी असा ठराव करुन मालेगाव मनपा यांनी दि.२६.०२.२०१६ रोजी म्हाडाकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्याअनुषंगाने आयएचएसडीपी योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मंजूर घेतेवेळी लाभार्थ्यांची यादी निश्चित करुन त्यास केंद्र शासनाची मान्यता घेण्यात येते. मंजूरी प्राप्त प्रकल्पातील लाभार्थ्याच्या यादीत बदल अपेक्षित असल्यास त्यानुसार संबंधित स्थानिक नागरी स्वराज्य संस्थेने सुधारित प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. मालेगाव मनपाने आयएचएसडीपी योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेले सर्व प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर असून ते मार्च, २०१७ अखेर देण्यात आलेल्या मुदतवाढीपर्यंत पूर्ण करावयाचे आहेत. त्याप्रमाणे वस्त्रोद्योग व्यवसायाशी संलग्न मजूर, कामगार इ.चा समावेश करुन या लाभार्थ्यांची नव्याने यादी तयार करुन त्यास केंद्र शासनाची मंजूरी मिळण्याबाबत सांशकत: वाटते असे आयुक्त, मालेगाव मनपा यांनी कळविले आहे.

मौजे, मालदे येथील शिल्लक असलेल्या जागेवर केंद्र शासनाच्या सर्वांसाठी घरे-२०२२ या संकल्पेनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेअतंर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी योजना हाती घेता येऊ शकेल असे आयुक्त, मालेगाव मनपा यांनी कळविले असल्याचे म्हाडाने कळविले आहे.

---

## राज्यात विशेषत: नाशिक शहरात मसाज पार्लरच्या नावाने देहविक्रीचा व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(९) ४३५३२ (१७-०५-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नाशिक शहरात मसाज पार्लरच्या नावाने देहविक्रीचा व्यवसाय सध्या जोरात सुरू असून कॉलेज रोड व गंगापूर रोडसारख्या उच्चभ्रुंच्या परिसरात अशाप्रकारचे अनेक अवैध धंदे सुरू असून तब्बल १० ते १२ मसाज पार्लर तरूणांना वाममार्गाला लावत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मसाज पार्लरच्या नावाने सुरू असलेल्या अवैध व्यवसायामुळे तरूणांची मोठया प्रमाणात फसवणूक होत असून या व्यवसायामुळे सलूनचा व्यवसायच बदनाम होत असल्याने सलून व्यावसायिकांचा मसाज पार्लरला तीव्र विरोध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करुन मसाज पार्लरच्या नावाने अवैध धंदे करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) अशी कुठलीही बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) पोलीस आयुक्तालय नाशिक शहर कडील पोलीस ठाणे हद्दीतील मसाज पार्लर वर गोपनीय कर्मचाऱ्यांमार्फत लक्ष ठेवून आहोत व काही अवैध व्यवसाय आढळल्यास लागलीच कायदेशीर कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**महाड तालुक्यातील (जि.रायगड) भेलोशी पंचक्रोशी माध्यमिक विद्यालयात होत असलेल्या गैरकारभाराबाबत**

**(१०) ४४६०७ (१६-०५-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड तालुक्यातील (जि.रायगड) भेलोशी पंचक्रोशी माध्यमिक विद्यालयातील एका शिक्षकाने केलेला गैरप्रकार व शिक्षक आणि संस्था चालकांचा मनमानी कारभार याला कंटाळून पंचक्रोशीतील सर्व माजी विद्यार्थी, पालक व महिलांनी संस्था चालकांना जाब विचारण्यासाठी व त्या गैरकृत्य केलेल्या शिक्षकाला शाळेतून निलंबित करण्यासाठी सुमारे सहा तास शाळेत आंदोलन केल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) तदनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) या प्रकरणी संबंधित सहायक शिक्षकास दिनांक ११.९.२०१६ पासून निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार (जि. पालघर) परिसरात बोगस फार्मासिस्ट पदव्या मिळवून अनेक मेडिकल स्टोअर्समधून नशेच्या औषधांची होत असलेली विक्री**

**(११) ४५२२८ (२८-०४-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि. पालघर) परिसरात बोगस फार्मासिस्ट पदव्या मिळवून अनेक मेडिकल स्टोअर्समधून नशेच्या औषधांची मोठया प्रमाणावर विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत किती बोगस मेडिकल स्टोअर्सवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-११-२०१६) :**(१) व (२) दिनांक २२/०१/२०१६ च्या दैनिक लोकमत च्या हॅलो पालघर-वसई या पुरवणीत या आशयाची बातमी प्रकाशित झाली होती. सदर बातमी ही केमिस्ट परीवार ऑफ न्युज या मेडीकल स्टोअर्स च्या संघटनेनी दिलेल्या माहितीच्या आधारावर छापल्याने बातमीत नमूद आहे. तथापि प्रशासनाकडून याबाबत सदर संघटनेकडे चौकशी केली असता त्यांनी अशा प्रकारची कोणतीही बातमी वर्तमानपत्रात दिल्याचे मान्य केलेले नाही, तसेच त्यांनी ते बातमीतील मजकूराशी सहमत नसल्याचेही लिहून दिलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा नगर परिषदेचा हद्दवाढीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(१२) ४६६७१ (१३-०५-२०१६). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा नगर परिषदेच्या हद्दवाढीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुदानित शारिरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सन २००६ ते २०११ पर्यंतचे सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबत**

**(१३) ४६७४५ (१६-०५-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित शारिरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सन २००६ ते २०११ पर्यंतचे सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अद्यापर्यंत देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना तातडीने थकबाकी देण्यात यावी असे मा. मुंबई उच्च न्यायालयाने निर्देश देऊनही थकबाकी दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू थकबाकी तातडीने देण्यात यावी अशी मागणी करुन थकबाकी न दिल्यास सचिवांच्या दालनात आंदोलन करण्याचा इशारा लोकप्रतिनिधींनी एका निवेदनाद्वारे मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,याबाबतची सद्यस्थिती काय आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) अंशतः खरे आहे.

अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेनुसार वेतन व तद्अनुषंगिक भत्त्यांच्या फरकाची थकबाकी प्रलंबित असल्याबाबतचे लोकप्रतिनिधींचे निवेदन माहे जानेवारी, २०१६ मध्ये प्राप्त झाले आहे.

(४) सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीनुसार १३१ शिक्षक कर्मचारी व ७२ शिक्षकेतर अशा एकूण २०३ कम्रचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दि.१.१.२००६ ते दि.३१.३.२०११ या कालावधीतील सुधारीत वेतनश्रेणीतील वेतनाच्या फरकाची रक्कम १२,००,३४,३५५/- संचालनालय स्तरावरुन अदा करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भडगाव नगरपालिकेतील (जि.जळगाव) कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१४) ४८२२० (०७-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव नगरपालिकेतील (जि.जळगाव) सध्या १७ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१६) :**
(१) भडगाव नगरपरिषदेतील राजयस्तरीय संवर्गातील १६ पदे रिक्त आहेत.
(२) सदर रिक्त पदे भरण्याबाबत दि.२२.०२.२०१६ रोजी नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे परिपत्रकान्वये सर्व जिलहाधिकारी व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांना सूचना दिलेल्या आहेत. जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांच्या स्तरावर पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिंतूर (जि.परभणी) येथे मोकाट जनावरांसाठी कोंडवाड्याची व्यवस्था नसल्याबाबत**

**(१५) ४८४०८ (०५-११-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतूर (जि. परभणी) येथे मोकाट जनावरांसाठी कोंडवाड्याची व्यवस्था नसल्याने कोंडवाडा उभारण्याची मागणी नगराध्यक्ष यांचेकडे स्थानिक नागरीकांनी निवेदन केले असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार जिंतूर नगरपालिका क्षेत्रात मोकाट जनावरांसाठी कोंडवाडा निर्माण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१६) :**(१) जिंतूर नगरपरिषदेकडे जनावरांसाठी कोंडवाडा उभारण्याची लेखी मागणी प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात शस्त्रक्रिया व वैद्यकीय उपचारांमधील सर्जिकल उपकरणांच्या तसेच अँजिओप्लास्टीसाठी वापरल्या जाणाऱ्या स्टेण्टच्या किंमती नियंत्रित करण्याबाबत**

**(१६) ५००२९ (०३-०५-२०१६). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शस्त्रक्रिया व वैद्यकीय उपचारांमधील प्राथमिक पायरी म्हणून आवश्यक ठरणाऱ्या सर्जिकल उपकरणांच्या विक्रीत तसेच कोणत्याही वैद्यकीय प्रक्रियेसाठी लागणाऱ्या सलाईन बाटल्या, आयव्हीचे टाके, स्कीन स्टेपलर, कॅथेटर, युरिन बॅग, ई. उपकरणांच्या किरकोळ विक्रीत रुग्णांचे हित लक्षात न घेता भरमसाठ नफा कमविला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्य शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाने आणि युनियन ऑफ रजिस्टर्ड फार्मासिस्ट्स या संस्थेने हृदय रोग उपचारात अँजिओप्लास्टीसाठी वापरल्या जाणाऱ्या स्टेण्टच्या किंमती तीनशे-चारशे पटीने जास्त असल्याचे केंद्र शासनाच्या फार्मास्टीकल विभागाला पत्रे सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्टेण्टच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्याकरीता प्रशासनाने राष्ट्रीय औषध निर्माण मूल्य प्राधिकरणास पत्र क्र. आयबी/२७७/१५/८, दि. १८.०५.२०१५ अन्वये कार्डियाक स्टेंटच्या किमती नियंत्रणाखाली आणण्याबाबत तसेच Profit Margin ठरविण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने उत्पादनाच्या दर्जाशी तडजोड न करता या नफेखोरीच्या गैरप्रकारास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (१८-११-२०१६) :**(१) सोसायटी फॉर अवेरनेस ऑफ सिव्हील राईटस् यांच्या दि.२३.०३.२०१४ च्या पत्रान्वये स्टेंटच्या वाढत्या किमंतीची बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणण्यात आली होती.

(२) प्रशासनाच्या गुप्तवार्ता शाखेव्दारा याबाबत सखोल चौकशी करण्यात आली. वैद्यकीय उपकरणांच्या किमतीवर नियंत्रण ठेवणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने प्रशासनातर्फे स्टेंटच्या वाढत्या किमतीबाबत राष्ट्रीय औषध निर्माण मूल्य प्राधिकरण यांना दि.१९.०९.२०१४ रोजी कळविण्यात आले आहे.

(३) व (४) प्रशासनाने केलेल्या चौकशीमध्ये स्टेंट छापील किंमतीपेक्षा जास्त किंमतीने विकल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे कारवाई करण्यात आली आहे. कार्डियाक स्टेंटची किंमत औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ अंतर्गत नियंत्रित होत नसल्याने उत्पादक स्वत: किंमत ठरवू शकतो. तथापि छापील किंमतीपेक्षा जास्त किंमतीला विक्री करण्यास

निर्बंध आहेत. स्टेंटच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याकरीता तसेच नफ्याचे प्रमाण ठरविण्याबाबत प्रशासनाकडून राष्ट्रीय औषध निर्माण मूल्य प्राधिकरणास वेळोवेळी कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर नगरपरिषदेतील जी आय एस प्रणालीच्या सर्वेक्षणात अपहार झाल्याबाबत**

**(१७) ५०१२२ (१७-०५-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) नगरपरिषद हद्दीतील जमीन व इमारतीचे पुन:सर्व्हेक्षण करणे , संगणकीकृत प्रणालीस जोडणे व संगणकीकृत कर आकारणी नोटीस काढण्याच्या कामात अपहार झाल्याची तक्रार माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक नगर सेवकांनी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वेक्षणाच्या कामासाठी जो यश टेक्नो सोल्युशन प्रा.कंपनी धारवाड कर्नाटक यास सर्व्हेक्षणाचे ५० लाखाचे देयक दिल्यानंतर पुन्हा तेच सर्व्हेक्षण करण्यासाठी एस.जी.आय स्टुडीओ गली दुं रोजनरेया इंडिया प्रा.लि.पुणे यांना देवून अपहार केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, तदनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१६) :**(१) या बाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कोणतेही लेखी निवेदन प्राप्त नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदपूर (जि. लातूर) तालुक्यातील हडोळती उपकेंद्रांतर्गत लघुदाब वाहिनीच्या तारा वारंवार चारीला जात असल्याबाबत**

**(१८) ५०५७४ (२४-०५-२०१६). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदपूर (जि. लातूर) तालुक्यातील हडोळती उपकेंद्रांतर्गत लघुदाब वाहिनीच्या तारा वारंवार चोरीला जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत तीन महिन्यात किनीकदु, सावरगाव थोट, हडोळती येथे लघुदाब वहिनीच्या २० गाळ्यातील तारा चोरल्याने या वाहिनीवरील विद्युत खांब मोडून पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत पोलीस स्टेशन अहमदपुर येथे फिर्याद देण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या अधिकाऱ्याला अपमानास्पद वागणूक देत पोलीसांनी गुन्हा दाखल न करता, चोरी होवू नये म्हणून लाईनवर वॉचमन ठेवा असा सल्ला दिला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी गुन्हा दाखल न होण्याची कारणे काय आहेत तसेच याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६)** :(१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) श्री.नारायण जगन्नाथ गिरी कनिष्ठ अभियंता यांनी बाळू मुळके यांच्या शेतातील दोन पोलवरील २०,०००/- रुपये किंमतीच्या तारा चोरीला गेल्याबाबत फिर्याद दिल्याने अहमदपूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३००२/२०१६ भारतीय विद्युत कायदा कलम १३६ तसेच भा.दं.वि. कलम ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

श्री.रोहीदास बालु राठोड, कनिष्ठ अभियंता यांनी श्री. गोविंद तुडमे यांच्या शेतातील वॉटर सप्लाय डीटीसी वरील २०० मीटर तार व प्रभाकर तरगुडहे यांच्या शेताती(ल ५०० मीटर तार चोरीला गेल्याबाबत दि. ०८/०२/१६ रोजी तक्रार दिल्याने अहमदपूर पोलिस स्टेशन येथे गु.र.नं. ४२/२०१६ भारतीय विद्युत कायदा कलम १३६ व भा.दं.वि. कलम ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

श्री. रोहीदास बालु राठोड कनिष्ठ अभियंता यांनी पाडुरंग गादेवार यांच्या शेतातील अंदाजे १००० मीटर किंमत ३०,०००/ रुपयांच्या तारा व सिमेंटचे पोल मोडून नुकसान केल्याबाबत दि. ०९/०२/१६ रोजी फिर्याद दिल्याने अहमदपुर पो.स्टे. येथे ४३/२०१६ भारतीय विद्युत कायदा कलम १३६ व भा.द.वि कलम ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमूद तिन्ही गुन्हयाचा तपास करुनही गुन्हे उघडीस न आल्याने मा. न्यायालयात अ वर्ग. समरी मंजुरीसाठी पाठवून गुन्हे निकामी काढण्यात आले आहेत.

सदर घटनेबाबत कायदेशीर गुन्हे दाखल करण्यात आले असुन तपासही करण्यात आलेला आहे. अशा प्रकारचे गुन्हे घडू नयेत म्हणून, सदर घटनास्थळाच्या परिसतरात पोलीसांची गस्त वाढविण्यात आली आहे. तसेच तक्रार देण्यास आलेल्या महावितरणाच्या अधिकाऱ्याला अपमानास्पद वागणूक पोलिसांनी दिलेली नाही.
(५) विलंब झालेला नाही.

---

**चाळीसगांव (जि.जळगांव) येथील मैत्रेय कंपनीतील ठेवीदाराचे पैसे परत मिळणेबाबत**

**(१९) ५१८४५ (१७-०५-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगांव (जि.जळगांव) येथील मैत्रेय कंपनीत अनेक नागरिकांनी एजंटमार्फत ठेवी ठेवल्या असून माहे जानेवारी, २०१६ पासून सदर कार्यालय बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मैत्रेय रिअॅल्टर्स अॅड प्लॉटरर्स, स्ट्रक्चर कंपनीच्या मुख्य संचालकांना अटक झाल्यानंतर सर्व्हर डाऊन झाल्याचा कांगावा करीत जळगाव जिल्हयातील सुमारे ३० मुख्य शाखा दिनांक ७ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या सुमारास बंद करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ठेवीदाराचे पैसे परत मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी जळगांव जिल्हा घटकात तक्रार/गुन्हे दाखल झालेले आढळून येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार महापालिकेतील सत्ताधारी आणि तत्कालीन अधिका-यांनी कंत्राटदारांच्या संगनमताने पालिकेची लूट केली असल्याबाबत**

**(२०) ५२४८३ (१७-०५-२०१६). अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महापालिकेच्या विविध विभागांमध्ये विविध कंत्राटदारांमार्फत कंत्राटी कामगार मागील अनेक वर्षापासून काम करत असून महापालिकेतील सत्ताधारी आणि तत्कालीन अधिका-यांनी कंत्राटदारांच्या संगनमताने पालिकेची लूट केली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालिकेत २८५० कर्मचारी अतिरिक्त असल्याचे आढळल्याने पालिका आयुक्त या कर्मचा-यांची कपात करण्याचा निर्णय घेणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१६) :**(१) सन २०१४-१५ मध्ये १७ ठेकेदारांकडून ३३८४ इतक्या कर्मचाऱ्याची ठेकातत्वार नेमणूक केली होती, ही वस्तुस्थिती आहे. त्यावर वार्षिक सुमारे रुपये ३४.८५ कोटी इतका खर्च झाला आहे.
(२) व (३) महानगरपालिकेने उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे व खर्चात बचत करणे, यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्तरावर गठीत समितीने मंजूर आकृतीबंधापेक्षा अतिरिक्त कर्मचारी कपात करावेत अशी शिफारस केली व तद्नुषंगाने २५८२ ठेकाकर्मचाऱ्यांची कपात करण्यात आली आहे.

उपरोक्त प्रकरणाची सखोल चौकशी करुन शासनास चार आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, पालघर यांना देण्यात आल्या.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पाचवी आणि आठवी इयत्तेच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याचा निर्णय**

**(२१) ५३८५३ (२२-०८-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाचवी आणि आठवीसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षा शिष्यवृत्तीत वाढ करुन दरमहा पाचशे रुपये शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१६ मध्ये वा त्या सुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर शिष्यवृत्ती देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये ३० हजार बेकायदा नळ जोडण्या झाल्याबाबत**

**(२२) ५४६५१ (२९-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये ३० हजार बेकायदा नळ जोडण्या झाल्या असल्याचे दि. २७ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आल्याने पाणीचोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्तांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे महापालिका हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती अनधिकृत नळ जोडण्यांवर कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६)** :(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे नगरसेवक यांच्याकडून अशा आशयाचे निवेदन आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना दि. २९/४/२०१६ रोजी प्राप्त झाले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अनधिकृत नळ जोडण्या निदर्शनास आल्यानंतर महानगरपालिकेकडून त्यांच्यावर कारवाई करण्यात येते.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून माहे एप्रिल, २०१६ पासून महानगरपालिका क्षेत्रातील ६६ अनधिकृत नळ जोडण्यांवर कारवाई करण्यात आली असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर नगरपालिकेच्या नमामि चंद्रभागा अभियानासाठी**
**प्राधिकरणाची स्थापना करण्याबाबत**

**(२३) ५४६५२ (२९-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर नगरपालिकेच्या चंद्रभागा शुद्धीकरणासाठीच्या नमामि चंद्रभागा अभियानासाठी प्राधिकरण स्थापन करण्याची घोषणा दिनांक १ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास पंढरपूर येथे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा आराखडा तयार करण्यात आला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व आराखडा तयार करण्यापूर्वी जलतज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, पंढरपूर नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे शहरातील गटारीचे पाणी चंद्रभागा नदीपात्रात मिसळुन नदीतील पाणी दुषीत होऊन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याचेही माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास सदरहू प्राधिकरण स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१६) :** (१), (२), (३) व (४) नमामी चंद्रभागा प्राधिकरण स्थापन करण्याबाबत शासनाने दिनांक १२/८/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्णय घेतला आहे. या प्राधिकरणाचे सदस्य सचिव म्हणून विभागीय आयुक्त पुणे यांना नमामि चंद्रभागा अभियानाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सर्व संबंधितांची बैठक आयोजित करुन कृती आराखडा निश्चित करण्याबाबत तसेच सदर आराखडा प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये सादर

करण्याच्या दृष्टीने प्रस्तावित बैठकीची कार्यसुची तयार करुन पाठविण्याबाबत दि. १४/०९/२०१६ च्या पत्रान्वये सुचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथे शासनाने उर्दू भाषेच्या विकासासाठी व अल्पसंख्याक विकास निधी देण्याबाबत**

**(२४) ५५३८१ (२५-०९-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे शासनाने उर्दू भाषेच्या विकासासाठी व अल्पसंख्याक विकास निधी कमी केला असून उर्दु भाषा लोप पावेल अशी भिती निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी निधी देण्याबाबत व उर्दु भाषेच्या संवर्धनासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत राज्यातील सात शहरांतील पाणी पुरवठा सुधारण्याबाबत**

**(२५) ५५३९१ (२९-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत राज्यातील सात शहरांतील पाणी पुरवठा सुधारण्यासाठी सुमारे २८६ कोटी रुपयांच्या कामासाठी माहे मे, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्याच्या सुमारास प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये कोणत्या शहरांचा समावेश करण्यात आलेला आहे व सदर निधीतून कोणकोणती कामे केव्हा सुरु करण्यात येऊन ती किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, उक्त अमृत योजनेमध्ये राज्यातील इतर कोणकोणत्या शहरांचा समावेश करणे आवश्यक आहे, त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व त्यादृष्टीने शासनाकडुन कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत,

(४) असल्यास, इतर शहराचा अमृत योजनेमध्ये समावेश करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१६) :**

(१) हे खरे आहे.

अमृत अभियानांतर्गत सात शहरातील पाणी पुरवठा सुधारण्यासाठी रु.२८६.०९ कोटी रुपयांच्या कामासाठी मे, २०१६ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(२)

* सदर योजनांमध्ये अचलपूर, हिंगणघाट, लातूर, पनवेल, सातारा, सोलापूर व वर्धा या ७ शहरांचया पाणीपुरवठा प्रकल्पाचा समावेश आहे.
* सदर योजनेमध्ये सदर शहरासाठी केंद्र शासनाच्या निकषानुसार पाणी पुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे.
* त्यासाठीचा कालावधी हा कामाच्या स्वरुपावरुन १२ महिने ते ३० महिने असा ठेवलेला आहे.

(३) व (४)

* केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत राज्यातील एकूण ४४ शहरांचा समावेश करण्यात आला आहे. अमृत अभियानांतर्गत सन २०१५-१६ च्या राज्य वार्षिक कृती आराखड्यामध्ये एकूण २१ पाणी पुरवठा योजना व १ मलनि:स्सारण योजनांचा समावेश आहे व त्यासाठी रु.१९४७.४१ कोटीचा आराखडा केंद्र शासनाने मंजूर केला आहे.
* सन २०१६-१७ च्या राज्य वार्षिक कृती आराखड्यामध्ये १४ पाणी पुरवठा योजना व ११ मलनि:स्सारण योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे व त्यासाठी रु.२४२९.९१ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे व त्यास केंद्र शासनाने मंजुरी दिलेली आहे.

---

## पुणे शहराचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मुळशी (टाटा) धरणातून पाणी योजना राबविण्याबाबत

**(२६) ५५६५२ (२६-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मुळशी (टाटा) धरणातून पाणी योजना राबविण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने रुपये १ हजार ३२५ कोटींचा प्राथमिक आराखडा तयार केला असल्याचे दिनांक ९ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेसाठीचा निधी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

सदर योजनेसाठी प्राथमिक आराखडा तयार करण्याचे काम हाती घेण्यात येणार असून, सन २०१५-१६ चे दरपत्रकानुसार ढोबळमानाने रुपये ११०० कोटी एवढा खर्च अपेक्षीत आहे.

(२) सदर योजनेकामी भविष्यात निधी उभा करणे शक्य होणेसाठी, सन २०१६-१७ पासून पाणी पट्टी मध्ये दरवाढ लागू केली आहे. सदर योजना राबविण्यासाठी किमान ४ ते ५ वर्ष इतका कालावधी लागू शकतो. या कालावधी मध्ये निधी उभाण्यासाठी पाण्याच्या दरातील वाढी व्यतीरिक्त इतर सेवा शुल्कामध्ये दरवाढ करणे किंवा कर्ज उभारणे, कर्जरोखे उभारणे या इतर स्त्रोतांचा सुध्दा विचार करणे शक्य आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कबनूर (जि. कोल्हापूर) येथे नगरपरिषद स्थापण करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(२७) ५५६५६ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कबनूर(जि. कोल्हापूर) येथे नगरपरिषद स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत असून त्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत दिनांक १४/७/२०११ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना मा. नगरविकास मंत्री यांनी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कबनूर (जि. कोल्हापूर) येथे नगरपरिषद स्थापन करणेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्यामार्फत विहीत मार्गाने शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कबनूर येथे नगरपरिषद स्थापन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१६) :** (१) व (२) जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे असे कोणतेही अभिलेख उपलब्ध नसल्याचे जिल्हाधिकारी यांनी नमूद केले आहे. मात्र कबनूर येथे नगरपरिषद स्थापन करण्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना शासनपत्र दि.२२/७/२००२ अन्वये सुचित करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडून कबनूर येथे नगरपरिषद स्थापन करण्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव अप्राप्त आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सहावी इयत्तेच्या अभ्यासक्रमांची पुस्तकांच्या किंमतीत झालेली वाढ

**(२८) ५५७५० (२२-०८-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदललेल्या सहावी इयत्तेच्या अभ्यासक्रमांची पुस्तके महागली असून पूर्वी ११७ रुपयांपर्यंत मिळणाऱ्या पुस्तकांसाठी पालकांना यावर्षी २८० रुपये खर्च करावे लागणार असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार दरवर्षी एका इयत्तेमध्ये बदल होत असून,यावर्षी सहावी इयत्तेमध्ये बदल होत आहे, परंतू या अभ्यासक्रम बदलाचा आर्थिक फटका पालकांना सहन करावा लागत असल्याने बदलणाऱ्या अभ्यासक्रमांच्या पुस्तकांच्या किंमती पालकांच्या आर्थिक आवाक्यात ठेवण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत. ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) यापूर्वी सन २००८ मध्ये इ. ६ वी च्या पाठयपुस्तकाच्या किंमती निश्चित केलेल्या होत्या. त्यानंतर या किंमतीमध्ये वाढ करण्यात आलेली नाही. यावर्षी इ. ६ वीच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली असून पाठयपुस्तकातील पानांचा आकार वाढवून छपाईमध्ये बदल करण्यात आला आहे. पाठयपुस्तक निर्मितीसाठी लागणाऱ्या खर्चामध्ये वाढ झाली आहे. सदर बाबींमुळे पाठयपुस्तकांच्या किंमती वाढल्या आहेत. तथापि, किंमती वाजवी राहतील याबाबत दक्षता घेण्यात आलेली आहे.

---

## मुंबई, ठाण्यासह राज्यातील आठ प्रमुख शहरांमध्ये मोठ्या संख्येने परवडणारी घरे उभारण्याबाबत

**(२९) ५५८६० (२९-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ठाण्यासह राज्यातील आठ प्रमुख शहरांमध्ये मोठ्या संख्येने परवडणारी घरे उभारण्यासाठी शासनाने कमाल जमीन धारणा कायद्याच्या (युएलसी) माध्यमातून मिळालेली शेकडो एकर जमीन खुली करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घर बांधणीकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला (म्हाडा) किती एकर जमीन हस्तांतरित करण्यांत आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१६)** :(१) व (२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील विभागीय गृहनिर्माण मंडळामार्फत अत्यल्प, अल्प व मध्यम उत्पन्न गटातील लोकांना परवडणा-या घरांची निर्मिती (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या अंतर्गत अतिरिक्त ठरलेल्या व शासन निहित जमिनी म्हाडाकडे वर्ग करण्याच्या दि.४/५/२०१६ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

यासंदर्भात विभागीय गृहनिर्माण मंडळामार्फत संबंधित जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, नागरी समुह यांच्याकडे जमिनीची मागणी नोंदविण्याची प्रक्रिया सुरु असून संबंधित जिल्हा तांत्रिक समितीच्या मान्यतेनंतर अशा जमिनीचे हस्तांतरण होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील कांजुर क्षेपणभूमीमुळे परिसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(३०) ५७४७० (२९-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कांजुर क्षेपणभूमीमुळे परिसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असून पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. तसेच, येथे टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने केली जात नसल्यामुळे सदरची क्षेपणभूमी बंद करण्याची मागणी स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधी करीत असल्याची बाब माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची क्षेपणभूमी बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०१६)** :(१) कांजूर क्षेपणभूमीमुळे परिसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असून पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे हे खरे नाही.

तसेच, कांजूर भरावभूमीमध्ये टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने केली जात नाही हे खरे नाही.

तथापि, सदर क्षेपणभूमी बंद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मागणी करण्यात आली होती हे खरे आहे.

(२) मुंबईतील कचऱ्यांची समस्या व मुंबईतील रहिवाशांच्या आरोग्यावर त्यामुळे होणारा परिणाम लक्षात घेऊन तसेच, कांजूर क्षेपणभूमी येथे दररोज स्विकारण्यात येणाऱ्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने बायोरिएक्टर तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया केली जात असून सदर क्षेपणभूमी बंद करणे हितावह ठरणार नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडयातील सर्व जिल्हयात धरणांनी तळ गाठल्याने सर्वत्र पाण्याची निर्माण झालेली तीव्र टंचाई**

**(३१) ५८०२६ (०१-०९-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र जुन २०१६ अखेरपर्यंत सुध्दा पाऊस न पडल्यामुळे पाणीसाठा कमी झाला असून राज्यातील सर्व धरणांमध्ये केवळ ९ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला असल्याची बाब माहे जुन २०१६ च्या अखेरीस निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक वाडयावस्त्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून चारा टंचाई सुध्दा निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने टंचाईग्रस्तांना पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-११-२०१६)** :(१) व (२) हे खरे आहे.
(३) राज्यातील ग्रामीण भागातील पाणी टंचाई निवारणार्थ माहे ऑक्टोबर, २०१५ ते जून, २०१६ या कालावधीकरीता एकूण ३८४७० गावे व २५५९२ वाड्यांकरिता एकूण ७२३७८ उपाययोजना समाविष्ट करुन पाणी टंचाई कृती आराखडा प्रस्तावित करण्यात आला होता. प्रस्तावित उपाययोजनांमधील जुलै, २०१६ अखेर २३५१४ गावे व १४६१९ वाड्यांमध्ये अशा एकूण ३८८०० उपाययोजना पुर्ण केल्या असून त्यावर रु.५०४५९.९५ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दहिसर (मुंबई) वीर संभाजी नगर येथील एअरपोर्ट ऍथॉरिटीच्या जागेत अनधिकृतपणे भरणी केली जात असल्याबाबत

**(३२) ५८५१० (२६-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर (मुंबई) वीर संभाजी नगर येथील एअरपोर्ट ॲथॉरिटीच्या (AAI) च्या जागेत अनधिकृतपणे भरणी केली जात असल्याचे माहे जून, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृतपणे भरणी करणाऱ्यांबाबत तेथील लोकप्रतिनिधी व नागरीकांनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृतपणे होत असलेली भरणी रोखण्याबाबत व भरणी करणाऱ्या संबंधितांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर अनधिकृत भरणी काढून टाकण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रादेशिक संचालक, एअरपोर्ट ॲथोरीटी ऑफ इंडिया यांना दिनांक ०१.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सदर ठिकाणी अनधिकृतरित्या मातीची भरणी करणा-या अज्ञात इसमाविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५२(४३) अन्वये कार्यवाही करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत स्थानिक पोलीस स्टेशनला कळविण्यात आले आहे.

तसेच, महानगरपालिकेमार्फत सदर अनधिकृत भरणी बाजूला करुन एअरपोर्ट ॲथॉरीटीच्या मालकीच्या भूखंडावरील सर्व कच्च्या नाल्यांच्या मार्गिका मोकळ्या करुन घेण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उस्मानाबाद शहरातील नाट्यगृहास वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत निधी देणेबाबत

**(३३) ५८५६९ (२९-०८-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद शहरात नाट्यगृह बांधकाम करणेसाठी शासनाकडून वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत मिळणारा निधी वापरण्याची तरतूद असल्यामुळे उस्मानाबाद नगर परिषद प्रशासनाने दिनांक २० एप्रिल, २०१५ च्या सर्वसाधारण सभा ठराव क्र. ८२ अन्वये वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत लागणारा रुपये २५४.०१ लक्ष निधी वापरण्यास मान्यता घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकामी लागणारी संबंधित विभागांची तांत्रिक मान्यता घेऊन तसेच सर्व कामांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा प्रशासनाने अद्याप या प्रस्तावास मान्यता न दिल्यामुळे नाट्यगृहाची इमारत वापराविना पडून आहे, यामुळे जिल्ह्यातील नाट्यरसिक, कलाकार व नागरिकात पसरलेला असंतोष, त्यामुळे या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देऊन नाट्यगृहाचे काम तातडीने पूर्ण करून घेण्याच्या नागरिकांकडून होत असलेल्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे मंजुरीची प्रक्रिया करण्यात आली नसल्यास शासनाने याबाबत चौकशी करून दोषींवर कोणती कार्यवाही केली आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :**(१), (२) व (३) उस्मानाबादा शहरामध्ये नाट्यगृह बांधकामासाठी वैशिष्ट्यपुर्ण योजनेमधून प्रशासकीय मान्यता मिळणेचा प्रस्ताव उस्मानाबाद नगरपरिषदेने जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना सादर केला आहे. ही बाब खरी आहे. तथापि, सुधारीत मराठवाडा विकास कार्यक्रमांअंतर्गत उस्मानाबाद येथे नाट्यगृह बांधकामासाठी रु. ४.८९ कोटीस शासन निर्णय दिनांक ११/०८/२००३ रोजी प्रशासकीय मान्यता व निधी उपलबध करुन दिला आहे. सदरच्या प्रशासकीय मान्यतेच्या आदेशात सर्व बाबी अंतर्भूत असून, याच बाबीची उस्मानाबाद नगरपरिषदेने वैशिष्ट्यपूर्ण योजनेत प्रशासकीय मान्यता मागितली आहे. एकाच कामासाठी दोनवेळा प्रशासकीय मान्यता देणे उचित होणार नाही ही बाब जिल्हा प्रशासनाने नमुद करुन, याबाबतच्या सविस्तर चौकशीसाठी उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समिती गठीत केली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### इयत्ता सहावीच्या इतिहासाच्या पुस्तकातील चुकीचे नकाशे दुरुस्त करण्याबाबत

**(३४) ५८७७३ (२२-०८-२०१६). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालभारतीने यावर्षी सहावीचा अभ्यासक्रम बदलला असून, नवी पुस्तके छापण्यात आली, मात्र या पुस्तकात दिल्ली चुकीच्या ठिकाणी तर मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात असणारी कान्हेरी गुहा अरबी समुद्रात दाखविली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास शासनाने प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१८-११-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) इयत्ता ६ वी च्या मराठी माध्यमाच्या इतिहासाच्या पाठयपुस्तकाच्या चुका दुरुस्त करुन सुधारित प्रत संकेत स्थळावर विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच मराठी माध्यमाच्या पुस्तकातील  चुका निदर्शनास आल्यानंतर इतर माध्यमांच्या पाठयपुस्तकांमध्ये नकाशे सुधारित करुन छापण्यात आले आहेत. पुस्तकातील क्यू.आर कोडच्या सहाय्याने पुस्तकाची सुधारित नकाशांसह असणारी प्रत सर्वांना पाहता येत आहे. तसेच, सर्व शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी यांना सुधारित नकाशा, संकेतस्थळ व क्यू.आर, कोडबाबत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समुद्राचे खारे पाणी शुध्द करण्याचा प्रकल्प उभारुन हे पाणी पाईपलाईनने लातूर व मराठवाडा आदी ठिकाणांना पोहोचविण्याच्या शासनाने आखलेल्या योजनेबाबत**

**(३५) ५८९७७ (१०-०८-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दीर्घकालीन उपाय म्हणून समुद्राचे खारे पाणी शुध्द करण्याचा प्रकल्प उभारुन सदर पाणी पाईपलाईनने लातूर व मराठवाडा आदी ठिकाणांना पोहोचविण्याची शासनाने योजना आखली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे पेयजलात रुपांतर करण्याविषयीचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-१०-२०१६) :** (१), (२), (३) व (४)  हे, खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

## राज्यात उर्दू साहित्य अकादमीस उर्दू भाषेच्या संवर्धनाकरिता सुमारे १० कोटी रुपयांचे सहाय्यक अनुदान तातडीने प्रत्यार्पित करण्याबाबत

**(३६) ५९४९६ (२०-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उर्दू साहित्य अकादमीस उर्दू भाषेच्या संवर्धनाकरिता सुमारे १० कोटी रुपयांचे सहाय्यक अनुदान तातडीने प्रत्यार्पित करण्याबाबतची मागणी अल्पसंख्यांक समाज धुरिणांनी, समाजसेवकांनी तसेच जनप्रतिनिधीबरोबरच तंत्र शिक्षणातील अल्पसंख्यांक विध्यार्थ्यांनी मा. मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा. राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) तसेच संबंधित जिल्ह्यांच्या/प्रादेशिक विभागांच्या संबंधित जिल्हा/प्रादेशिक आयुक्त व प्रशासनाधिकारी यांच्याकडे माहे मे, २०१६ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती राज्यात उर्दू साहित्य अकादमीस उर्दू भाषेच्या संवर्धनाकरिता सुमारे १० कोटी रुपयांचे सहाय्यक अनुदान तातडीने प्रत्यार्पित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१६) :** (१) असे कोणतेही निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बालेवाडी जिल्हा पुणे येथील पुलाच्या कामाबाबत

**(३७) ६०३९३ (२६-०८-२०१६). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालेवाडी जिल्हा पुणे येथे पुणे महापालिकेने सर्वे नं. ४६ व ४७ मध्ये कोणताही रस्ता नसताना ४० कोटी रु.खर्च करून पुलाचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,या पुलाच्या बांधकामासाठी २०१२ मध्ये मंजुरी देण्यात आली होती व ३२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी रस्ता अस्तित्वात नसताना पुलाचे बांधकाम करून ४० कोटी रूपये त्यावर खर्च करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१६) :** (१), (२) व (३) नाही.

प्रस्तुत कामाची निविदा रक्कम रुपये ३१.४५ कोटी इतकी आहे. सदरचे काम पूणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने व आर्थिक सहभागातून करणेत येत असून प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या प्रत्येकी ५०% रक्कम दोन्ही महानगरपालिकांनी खर्च करावयाची आहे. सदरचे पूलापर्यंतच्या रस्त्याच्या कामाकरिता पुर्ण महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात रक्कम रुपये १०.५० कोटी इतकी तरतूद उपलब्ध आहे. त्यानुसार पूलापर्यंत ३० मीटर रुंदीचा रस्ता करण्यात येणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील अंदाजे ३० मीटर रुंदीच्या ६० मीटर लांबीच्या ॲप्रोच रस्त्याची जागा ताब्यात घेणेची कार्यवाही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून सुरु आहे. पूलाचे काम पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये रस्त्याचे काम करणेत येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई भांडूप (प) येथील एम.व्ही आर शिंदे मार्ग ते भांडूप स्टेशमार्ग या रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत

**(३८) ६०६८० (२९-०८-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई भांडूप (प) येथील लालबादूर शास्त्री मार्गावरील वाहतूकीस अडचण निर्माण होणाऱ्या एम.व्ही आर शिंदे मार्ग ते भांडूप स्टेशनमार्ग या रस्त्यावरील ४४ व्यावसायीक बांधकामे हटवून रस्त्याच्या रूंदीकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पूर्ण करण्यात आले आहे काय,

(२) असल्यास, रस्ता रूंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या गाळेधारकांना पर्यायी जागा देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१६) :** (१) सदर रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अद्यापपर्यंत पूर्ण करण्यात आलेले नाही.

(२) रस्ता रुंदीकरणामुळे बाधीत होणा-या गाळेधारकांना पर्यायी जागा देण्याबाबतची कार्यवाही अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नाही.

(३) भांडुप (पश्चिम) येथील लालबहादूर शास्त्री मार्गावर एम.व्ही.आर.शिंदे मार्ग ते टँक रोड या भागात रस्ता अरुंद असून रस्ता रुंदीकरणात एकूण ४४ बाधकामे बाधीत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर बाधीत बांधकामधारकांची कागदपत्रे मागविण्यात आली असून, सदर कागदपत्रे मागविण्यात आली असून, सदर कागदपत्रांवरुन बाधीत बांधकामधारकांची पात्रता निश्चित करण्याचे कामे प्रगतीपथावर आहे.

सदर बाधीत बांधकामधारकांची पात्रता निश्चित केल्यानंतर महानगरपालिकेमार्फत पात्र बांधकामधारकांना पर्यायी जागा देवून रस्ता रुंदीकरण करण्यात येणार आहे.

---

**पुणे शहरातील रुग्णालयांमध्ये झालेल्या अनधिकृत बांधकामाबाबत**

**(३९) ६०८७६ (२९-०८-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील ३८ नामांकित रुग्णालयांमध्ये अनधिकृत बांधकामे करण्यात आली असल्याची बाब जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुणे महापालिकेच्या अहवालात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे ७१ हजार चौरस फुटाचे अनधिकृत बांधकाम करण्यात आले असून केवळ ८ हजार ६०० चौरस फुट अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

५१ खाजगी रुग्णालयांच्या पाहणीमध्ये एकूण २५ हॉस्पीटल्स मध्ये अनधिकृत बांधकाम आढळून आले आहे.

(२) पाहणीत सुमारे ६६३१ चौ.मी. क्षेत्राचे अनधिकृत बांधकाम आढळलेले आहे. त्यापैकी सुमारे ३४९६ चौ.मी. अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले आहे. काही प्रकरणात मा.न्यायालयाची स्थगिती आदेश असून सदर स्थगिती आदेश उठल्यावर कारवाई करणे शक्य होणार आहे.

(३) अनधिकृत बांधकामाबात वेळोवेळी जागा पहाणी करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमातील तरतूदीनुसार नोटीसा देऊन कारवाई करणेत आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण - डोंबिवली आणि त्या पुढील पट्ट्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी-सुविधासाठी ठाणे आणि कल्याण येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करणेबाबत**

**(४०) ६०९३८ (२२-०८-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.नितेश राणे (कणकवली),**

**श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण - डोंबिवली आणि त्या पुढील पट्ट्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी-सुविधा प्राप्त व्हाव्यात, यासाठी ठाणे आणि कल्याण येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्यात येईल, अशी घोषणा सन २००६ मध्ये मुंबई विद्यापीठाद्वारे करण्यात येऊन अद्यापही कल्याणच्या उपकेंद्राला मुहूर्त मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता ठाणे-कोलशेत येथे मुंबई विद्यापीठाचे आतंरराष्ट्रीय ख्यातीचे उपकेंद्राचे भूमिपूजन करण्यात येवून केवळ दोनच अभ्यासक्रम सुरु होवून १२ विद्यार्थीच शिक्षण घेत आहेत,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग (१) बाबत महापालिकेकडून मुंबई विद्यापीठाला भूखंड उपलब्ध करुन देण्यात आलेला असूनही, आजतागायत कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली आणि आसपासच्या विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी लवकरात लवकर सदर उपकेंद्रामध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करुन विद्यार्थ्यासाठी कोर्सेस सुरु करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-११-२०१६) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व मुंबई विद्यापीठ यांच्यादरम्यान सामंजस्य करार करण्यात आला असून दिनांक २३ मार्च, २०११ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून २५,३७० चौ.मी.जमीन ताब्यात घेण्यात आली आहे. महानगरपालिकेकडून इमारतीच्या आराखड्यांना मान्यता मिळाली आहे. कल्याण येथील उपकेंद्राच्या जागेच्या तीनही बाजूचे संरक्षण कुंपण बांधण्यात आलेले असून, कल्याण उपकेंद्राच्या तळमजला अधिक पहिल्या मजल्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत उपकेंद्र सुरु होण्यासाठी पहिल्या टप्प्यातील सुमारे ४८,००० चौ.फूट क्षेत्रफळाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून ४ वर्ग खोल्या, प्रशासन कार्यालय, ग्रंथालय इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली आहेत. ठाणे परिक्षेत्रात एकंदर २३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर उपकेंद्रामध्ये एम.टेक (कम्प्युटर इंजिनिअरींग) हा अभ्यासक्रम सुरु केला जाणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महापालिकेच्या परिवहन विभागाच्या**
**नव्या बसेस तातडीने सुरु करण्याबाबत**

**(४१) ६१००७ (२६-०८-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली महापालिकेच्या परिवहन विभागाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असून

करोडो रुपये खर्चून खरेदी केलेल्या ६० नव्या बसेस वापराविना पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन बसेस प्रवाशांच्या सेवेत आणण्याची मागणी होत असताना चालक आणि वाहका अभावी त्या रखडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्या बसेस प्रवाशांच्या सोयी करिता तातडीने सुरु करण्याकरिता तसेच चालक आणि वाहकांची भरती प्रक्रिया करण्याबाबत शसनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाकरीता १८५ बसेस मंजूर झाल्या आहेत. त्यापैकी ७० बसेस उपक्रमाच्या ताफ्यात दाखल झाल्या असून त्यापैकी १० वातानुकूलित बसेस नियमित वेळापत्रकानुसार चालविण्यात येत आहेत.

उर्वरित ६० बसेस बाह्य यंत्रणेमार्फत चालविण्याकरीता प्रयत्न करुनही प्रतिसाद न मिळाल्याने या बसेस परिवहन सेवेकडील उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून आळीपाळीने चालविण्यात येत आहेत.

या बसेस बाह्य सहाय्यीत यंत्रणेमार्फत चालविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आल्याचे आयुकत, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(२) व (३) महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमातील बसेस ग्रॉस कॉस्ट कॉन्ट्रक्ट पध्दतीने प्रति कि.मी. तत्वावर वाहनचालकासह परिचालन व परिरक्षणाकरीता देण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून पुन:श्च निविदा प्रसिध्द करण्यात आली असून त्यास प्रतिसाद मिळाला आहे. ही प्रक्रिया पुर्ण होताच नवीन बसेस पुर्ण क्षमतेने चालविता येतील.

याखेरीज बाह्य यंत्रणेद्वारे वाहन पुरवठा करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून निविदा प्रसिध्द करण्यात आल्या असून प्राप्त निविदांवरील प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुण्यातील सिंहगड शिक्षण संस्थेच्या पुण्यासह राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मानधन मिळाले नसल्याबाबत

**(४२) ६१२१३ (२२-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सिंहगड शिक्षण संस्थेच्या पुण्यासह राज्यातील नऊ शैक्षणिक संकुलातील सुमारे १२ हजार शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गत १ वर्षापासून मानधन मिळाले नसल्याचे माहे जून, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात संस्था चालकांवर कारवाई करण्याची मागणी शिक्षक, कर्मचाऱ्यांनी मा. मुख्यमंत्री महोदय यांना माहे जून, २०१६ वा त्या दरम्यान केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) प्रश्नाधीन प्रकरणी अभियांत्रिकी व पदविका संस्थांच्या प्राप्त तक्रारीनुसार सर्व संबंधित संस्था प्रमुखांना कार्यवाही करण्याबाबत सूचीत करण्यात आले आहे.

---

**खडकवासला धरणातून पुणे शहरास मिळणाऱ्या पाण्याच्या होत असलेल्या गळतीबाबत**

**(४३) ६१३१४ (२९-०८-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला धरणातून पुणे शहरास मिळणाऱ्या पाण्याची चाळीस टक्के होणारी गळती रोखण्यात महापालिकेला अपयश आल्याची बाब माहे मे, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे अठरा वर्षापूर्वी किर्लोस्कर कन्सल्टन्सीकडून महापालिकेने पाणीपुरवठ्यासंबंधी तयार करून घेतलेल्या अहवालानुसार उपाययोजना न केल्याने गळतीचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.

सन १९९७ मध्ये किर्लोस्कर कन्सल्टन्सी या सल्लागार मार्फत पुर्ण शहरासाठी सन २०१५ च्या लोकसंख्येसाठी प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्यात आलेला होता. सदर संपुर्ण प्रकल्पाची अंमलबजावणी पुर्ण झालेली आहे. या प्रकल्पामध्ये पाण्याच्या गळतीवर उपाययोजना करणे या बाबींचा समावेश नाही.
(३) खडकवासला धरणातून मिळणारे पाणी शहरामध्ये पुरवठा करताना साधरणपणे ३५ ते ४० टक्के एवढे गळतीचे प्रमाण आहे. सदर गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी खडकवासला धरण ते पर्वती जलशुध्दीकरण केंद्र व खडकवासला धरण ते वारजे जलशुध्दीकरण केंद्रापपर्यंत बंद पाईपलाईनचे काम करण्यात आले आहे तसेच सध्या पर्वती जलशुध्दीकरण केंद्र ते लष्कर जलशुध्दीकरणकेंद्रापर्यंत बंद नलिकेचे काम प्रगतीपथावर आहे. शिवाय समान पाणीपुरवठा योजना मंजूर झाली असून सदर योजना कार्यान्वित झाल्यावर गळतीचे प्रमाण कमी होणार

आहे. वितरण व्यवस्थेमधील नलिका फुटुन होणारी पाण्याची गळती वेळोवेळी दैनंदिन देखभाल दुरुस्ती करुन थांबवली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारंजा नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्यास होत असलेला विलंब**

**(४४) ६१७२२ (२९-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारंजा नगरपरिषदेच्या (जि. वाशीम) तत्कालीन मुख्याधिकारी श्रीमती गीता वंजारी यांनी बेकायदेशीर आणि नियमबाह्य वाहनांचा वापर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्रीमती वंजारी यांनी केलेल्या शासकीय प्रवासाच्या हेतूची नोंद दस्तावेज मध्ये केली नाही, तसेच प्रवासाचे रुपये १,६७,९२० चे देयक रोखीने अदा करताना महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील तरतुदींचा भंग केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्रीमती वंजारी यांनी सन २०११-१२ च्या लेखापरीक्षणातील परीच्छेद क्र.७ आणि ३७ या लेखा आक्षेपाबाबत अनुपालन अहवाल अद्यापि सादर न करता विभागीय आयुक्त अमरावती यांच्या निर्देशांचा अवमान केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, श्रीमती वंजारी यांनी कारंजा शहरातील इमारतींचे पुन:मुल्यांकन करताना नियुक्त केलेल्या स्थापत्य सल्लागार प्रा. ली. अमरावती यांच्या करारनाम्यातील नियम आणि शर्ती यांचे पालन केले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, श्रीमती वंजारी यांचेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०१६) :**(१) व (२) याबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांनी चौकशी केलेली असून त्या संदर्भात श्रीमती गीता वंजारी तत्कालीन मुख्याधिकारी, नगरपरिषद-कारंजा यांच्याविरुध्द शिस्तभंगाविषयक कार्यवाही करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.
(३) लेखापरिक्षण परिच्छेदाबाबत मुख्याधिकारी यांच्यामार्फत विहित प्रक्रिया पार पाडण्यात येत आहे.
(४) खरे नाही.
(५) शासनाने श्रीमती गीता वंजारी यांच्यावर दिनांक १६ मे, २०१६ रोजी विभागीय चौकशी संदर्भात दोषारोप बजाविण्यात आलेले आहेत.

---

**मालेगांव (ता.रिसोड,जि.वाशिम) येथील गावांमध्ये निर्माण झालेली पाणीटंचाई**

**(४५) ६२१३३ (१०-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव व रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील अनेक गावांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असल्याने शासनाने याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी तेथील नागरिकांनी केली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालेगांव तालुका हा पाणीटंचाई ग्रस्त आहे सध्या १६ गावांत टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे तर ४ ते ५ गावांत टँकर सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित तहसिल कार्यालयात प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावांतील पाणीटंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अंशतः खरे आहे.

दिनांक १०.०७.२०१६ अखेर मालेगाव तालुक्यात २० गावात २० टँकरने तसेच ६३ गावात ८१ विहिर खाजगी विहीर अधिग्रहणाद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला. तसेच रिसोड तालुक्यात ९ गावात १० टँकरने व ५५ गावात ९७ खाजगी विहीर अधिग्रहणाद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

तथापि,जून २०१६ मध्ये मालेगाव व रिसोड तालुक्यात टँकर लावण्याबाबतचे प्रस्ताव प्रलंबित नव्हते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व शिरूर नगरपंचायतीमध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(४६) ६२३९३ (२९-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि. बीड) या नगरपंचायतीमध्ये पिण्याचे पाणी, शौचालय, सांडपाणी व्यवस्थापन इ. मुलभूत सुविधांची वानवा असल्याने नागरिकांची व तेथील कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब माहे जून, २०१६ वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरसोयी दूर करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१६) :** (१) व (२) माहे जून महिन्यात शिरुर (कासार) नगरपंचायतीमध्ये नियमीत पाणीपुरवठा करण्यात आला होता. आष्टी नगरपंचायतीत २१ व पाटोदा नगरपंचायतीत १६ टॅकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला होता. स.स्थितीत तीन्ही नगरपंचायत क्षेत्रात नियमीत पाणीपुरवठा चालू आहे. सवच्छ महाराष्ट्र योजनेअंतर्गत शौचालयासाठी सर्व्हेक्षणाचे काम तीनही नगरपंचायत क्षेत्रात चालू असून त्यामध्ये ज्या कर्मचाऱ्यांकडे त्यांचे निवासांमध्ये शौचालयाची व्यवस्था नाही, त्यांना या योजनेअंतर्गत शौचालय देण्याचे नगरपंचायतींनी प्रस्तावित केलेले आहे. सांडपाणी व्यवस्थापनाबाबत सन २०१६-२०१७ च्या जिल्हा नियोजना समितीकडून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजनेतून दलीत वसती प्रभागासाठी व नागरी दलीतेत्तर वस्ती सुधार योजनेतून मिळणारा निधी या दोन्ही योजनेच्या प्राप्त होणाऱ्या निधीमधून नाल्यांची कामे प्रस्तावित करत असलेचे कळविले असून १४ वा वित्त आयोग योजनेतून घनकचरा व्यवस्थानाची कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत असे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व शिरूर (जि. बीड) या नगरपंचायत क्षेत्रातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४७) ६२३९६ (२९-०८-२०१६). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि. बीड) या नगरपंचायत क्षेत्रातील रस्त्यांची अत्यंत दैनावस्था झाली असल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, शासनाने याबाबत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, संबंधित नगरपंचायतींतील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१६) :**(१), (२) व (३) शासन निर्णय दि. ८ मार्च, २०१६ अन्वये आष्टी, पाटोदा व शिरुर (कासार) या तीनही नगरपंचायतीस प्रत्येकी रु.२०.०० लक्ष सर्वसाधारण रस्ता अनुदान मंजूर झाले असून त्यामधून नगरपंचायत क्षेत्रातील रस्त्याची कामे करण्यात येत आहेत व सन २०१६-१७ सालासाठी जिल्हा नियोजन समितीकडून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजनेतून दलीत वस्ती प्रभागासाठी व नागरी दलीत्तेतर वस्ती सुधार योजनेतून मिळणारा निधी या दोन्ही योजनेच्या प्राप्त होणाऱ्या निधीमधून रस्त्यांची कामे प्रस्तावीत करुन रस्ते सुधारणा करणेचे तीनही नगरपंचायतींनी प्रस्तावित केले आहे यासंदर्भात नगर पंचायत स्तरावर पाहणी झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अर्धापुर शहरासाठी (जि.नांदेड) पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत**

**(४८) ६३०२९ (२६-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापुर शहरासाठी (जि.नांदेड) पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत अनेक वर्षापासून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्धापुर शहरात पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अर्धापुर शहराचा २४/७ पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांच्याकडे ऑगस्ट, २०१६ मध्ये सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव तांत्रिक सहमतीसाठी संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला आहे.

---

**गॅस सिलेंडर वितरण्यात होत असलेला काळाबाजार**

**(४९) ६३७९१ (१०-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-ठाण्यात २०० च्या वर गॅस एजन्सी असून महिन्याला सुमारे २५ लाख सिलिंडरचे वितरण केले जात असून, घरगुती गॅस सिलिंडर जोडण्या देताना एजन्सीकडून आवश्यक असणारे सर्व पुरावे घेतले जातात तथापि व्यवसायिक सिलिंडर देताना पुरावे न तपासताच सिलिंडरचा वापर कसा वा कोणत्या ठिकाणी करणार आहे, त्यांच्याकडे आवश्यक त्या परवानग्या आहे की नाही याची खातरजमा न करता, पैसे मोजले की पाहिजे तेवढे व्यवसायिक सिलिंडर वितरण होत असल्याची बाब माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या पाहणीत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारचे सिलिंडर हॉटेल, फुटपाथ रस्त्याच्या कडेला चौकाचौकातून असुरक्षितपणे ठेवण्यात व हाताळण्यात येत असून, काही हॉटेल मालक हॉटेलच्या गच्चीतल्या कोपऱ्यात किंवा अनाधिकृतपणे उभारलेल्या पोटमाळयावरील एकावर एक कोंबून ठेवण्यात येत असल्याने गत वर्षी कुर्ल्यातील हॉटेल किनारा दुर्घटनेनंतर मुंबई महानगरपालिकेने केलेल्या तपासणीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, अन्न व नागरी पुरवठा विभाग, पोलीस व संबंधित कंपन्या यांच्याकडून नियमित तपासण्या होत नसल्यामुळे हॉटेल मालकाकडून गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (१६-११-२०१६) :**(१) व्यावसायिक सिलेंडर देताना व्यायसायिकाने कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरच त्यांना गॅस वितरकांकडून सिलेंडर पुरविले जातात. तसेच सहा महिन्यातून एकदा गॅस कंपन्यांचे अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी सदरील व्यावसायिक सिलेंडरचा ज्या ठिकाणी वापर सुरु आहे त्या जागेची पाहणी व तपासणी करतात.
(२) होय, हे खरे आहे.

कुर्ल्यातील हॉटेल किनारा येथील दुर्घटना घडल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभागामार्फत अग्निशमन अधिकारी, आरोग्य अधिकारी व इमारत विभागातील अभियंते यांचे "संयुक्त पथक" बनवून एल विभागात असलेल्या हॉटेलची दि.१९/१०/२०१६ पासून युध्दपातळीवर स्थळ पहाणी करुन त्या हॉटेलमध्ये असलेल्या अनियमिततेस तपासून संयुक्तपणे कारवाई करण्यात आलेली आहे. सदर कारवाई दरम्यान एकूण १८३ उपहारागृहांची तपासणी करुन, कलम ३९४ अंतर्गत निरिक्षण अहवाल देऊन न्यायालयीन खटला करण्यात आलेला आहे. तसेच एका उपहारगृहावर जप्तीची कारवाई करण्यात आलेली आहे व अद्यापही अनियमितता असलेल्या हॉटेलांवर कारवाई करण्याचे कामकाज सुरु आहे. वरिष्ठ निरिक्षक (अतिरिक्त) यांच्या खात्यामार्फत एकूण १४२ गॅस सिलिंडर्स जप्त करण्यात आले आहेत.
(३), (४) व (५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्य अखत्यारीतील नियंत्रक शिधावाटप यंत्रणेमार्फत वेळोवेळी तपासण्या घेण्यात येतात. तसेच गॅस कंपन्यांचे अधिकारी अथवा त्यांच्या प्रतिनिधीमार्फत सहा महिन्यांतून एकदा तपासणी करण्यात येते. गॅस सिलेंडरच्या अनधिकृत वापराला आळा बसावा या करीता नियंत्रक शिधावाटप कार्यालयामार्फत वेळोवेळी धाडी/तपासणीची कार्यवाही करण्यात येते. माहे १ जानेवारी, २०१६ ते ३० सप्टेंबर, २०१६ या कालावधीत या यंत्रणेमार्फत ७ धाडी/तपासण्या करण्यात आलेल्या असून १२ व्यक्तीविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण रु.१८,९९,७००/-(रुपये अठरा लाख नव्यानव हजार सातशे फक्त) इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

---

**शालेय पोषण आहाराची माहिती शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांना ऑनलाईन भरुन नियमित दररोज मोबाईलवर एस.एम.एसद्वारे कळविण्याबाबत सुविधा व साहित्याचा पुरवठा करुन देण्याबाबत**

**(५०) ६४०७४ (२२-०८-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करुन सदर योजना गेल्या काही वर्षापासून शासनाच्या आदेशानुसार आदिवासी डोंगराळ भागात व अनेक तालुक्याच्या ग्रामीण भागात सुरु करण्यात आलेली आहे,, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय पोषण आहाराची माहिती ऑनलाईन भरुन नियमित दररोज मोबाईलवर एस.एम.एसद्वारे कळविण्याबाबत शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांना सक्तीचे केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शासनाच्या आदेशानुसार आदिवासी डोंगराळ भागात व अनेक तालुक्याच्या ग्रामीण भागात शालेय पोषण आहाराची माहिती देण्यासाठी संबंधित शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांना संगणक, इंटरनेट जोडणी मोबाईल रेंज यासारख्या सुविधा व साहित्याचा पुरवठा करुन देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (२) च्या संदर्भात राज्यात शालेय पोषण आहार योजनेतंर्गत सुविधा व साहित्याचा पुरवठा करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१६) :**(१) व (२) शालेय पोषण आहार ही केंद्रपुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येते. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यात शालेय पोषण आहार योजनेची माहिती संकलित करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून दररोज योजनेची माहिती एस.एम.एस./ऑनलाईन/मोबाईल ॲप द्वारे भरणे बंधनकारक आहे.
(३) व (४) काही डोंगराळ भागामध्ये भ्रमणध्वनीला रेंज नसल्याने व इंटरनेट सुविधा नसल्याने दररोज माहिती पाठविणे शक्य होत नाही. केवळ अशा शाळांबाबत काय उपाययोजना करण्यात येईल, याबाबत विचारविनिमय सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.